पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव-३३
गक्षेका/४/कावि / ८४ /२०१८
दिनांक : २५ /१०/२०१८

प्रति,
मा. ---- ---------------- -
सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा
**शनिवार दि. ३/११/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीच्या मासिक **सभेचे नियोजित दिवशी दिवाळीसण असल्याने मा.ग प्रभाग अध्यक्ष यांचे सुचनेनुसार मा.ग प्रभाग समिती मासिक सभा शनिवार दिनांक ३/११/२०१८ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील “ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह ” येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
गप्रभागसमिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ८**

**दिनांक : ३/११/२०१८** वेळ: **सकाळी ११.०० वाजता**

-----------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा **शनिवार दिनांक ३/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दि. १/१०/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ७) कायम करणे.

**विषय क्रमांक १)** मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांपैकी आयडेंटिटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक २)** मा.क्षेत्रिय अधिकारी ग प्रभाग यांचे पत्र क्र.गक्षे/०२/कावि/५११/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील एकुण ६४४ फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण झालेले आहे. त्यापैकी बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांची संख्या २८४ इतकी आहे. बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांपैकी २०६ फेरीवाल्यांना फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे. ज्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे, त्यांना जागा निश्चीत करणे आवश्यक आहे.

याबाबत हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी क्षेत्रिय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करणेबाबत दि.२७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेमध्ये मा.आयुक्त यांनी सुचविल्यानुसार हॉकर्स झोन तयार करणेसाठी केंद्र व राज्यशासन यांचे नियम व मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार प्रभाग स्तरावर एक उपसमिती स्थापन करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे –

प्रभाग हॉकर्स झोन फेरीवाला उपसमिती

१) श्रीम.स्मिता झगडे – अध्यक्ष – क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रिय कार्यालय
२) श्री.देवन्ना गट्टुवार – सदस्य – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, ग क्षेत्रिय कार्यालय
३) श्री.सुनिल भागवानी – सदस्य - उपअभियंता नगररचना विभाग
४) श्री.सतिष माने – सदस्य – वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाकड

५) श्री.एस एस घोळवे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक, वाकड

६) श्री.किशोर म्हसवडे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक,पिंपरी

७) श्री.हनुमंत रोकडोबा सरवदे – सदस्य अतिक्रमण निरीक्षक,अतिक्रमण विभाग (स्थापत्य)

८) श्री.एफ डी ए प्रतिनिधी (food & drug administration) (अन्न सुरक्षा प्रशासन)

९) फेरीवाला संघटनेचे सदस्य

१) श्री. शंकर शिनगारे – घर क्र.४२१/२ ज्योतिबा नगर काळेवाडी पुणे १७

२) श्री.निलेश राजेंद्र जाधव – यशोदा कॉलनी, रहाटणी फाटा, पुणे १७

३) श्री.अमित कुदळे – पिंपरी पुणे १७

सबब उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समितीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्रानुसार शहरामध्ये माजी नगरसदस्य/नगरसदस्या, स्वीकृत नगरसदस्य यांचे जुने झालेले दिशादर्शक फलक काढण्यात आलेले आहेत. प्रभागामध्ये इतरत्र कचरा टाकण्याचे ठिकाणावर सदर फलकांची दुरुस्ती करुन त्यावर कचरा न टाकण्याचे विनंती फलक बसविण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी येथील पवनेश्वर मंदिराजवळ १५ मीटर व १८ मीटर डी.पी एकत्र येऊन सदर ठिकाणी चौक तयार होणार आहे. सदर चौकास कै.साथी दामुआण्णा कुदळे (मा.सरपंच) असे नामकरण करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे

**टिप – (मा.अध्यक्ष यांचे आदेशानुसार सर्व शाखाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित उपरोक्त विषयांची सविस्तर माहिती/टिपण तयार करुन मासिक सभेचे वेळी उपस्थित रहावे.)**

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रिय कार्यालय, थेरगाव ३३
क्र.गक्षेका/कावि/४/८४ /२०१८
दिनांक २५ /१०/२०१८